# कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय


बांधकाम विभाग रत्नागिरी, जिल्हा परिषद रत्नागिरी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, रत्नागिरी - 415 612

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक - (०२३५२) २२२२४२/२२००७६ | email-ee_wd_rtnzp@yahoo.in |
| जा.क्र.रजिप/बांधकाम/लेशा/निविदा/अे-७/ ३१३२ /२०२३ | दिनांक :- १९ /०५/२०२३ |


प्रति,

संरपंच ग्राम पंचायत धामापूर तर्फे देवरुख

धामापूर तर्फे देवरुख ता. संगमेश्वर

विषय :- कामाचे कार्यारंभ आदेश.....

धामापूर तर्फे देवरुख बौध्दवाडी समाजमंदिर येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. ता. संगमेश्वर

लेखाशीर्ष:- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२०२३

अंदाजपत्रकीय रक्कम ४०००००.०० निविदा रक्कम :- ३५२४१९.००

महोदय,

आपण दि. २९ .०३ .२०२३ रोजी दिलेली उपरोक्त कामांची निविदा **अंदाजपत्रकीय** दराने मंजूर झालेली असल्याने तसेच रक्कम रुपये ५००/- च्या मुद्रांकावर सदर कामाचा करारनामा पूर्ण करुन दिल्याने काम सुरु करण्यास या द्वारे आदेश देण्यात येत आहेत. तरी उप अभियंता **संगमेश्वर** यांचेकडून कामाची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे कामाला सुरुवात करावी. कामाची मुदत दि.१९ /०५ /२०२३ ते दि. १८/१२/२०२३ अशी असेल.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन आदेश क्र. झेडपीए २००८/प्र.क्र.४७४/ वित्त-९ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दि.०३ डिसेंबर २०११ अन्वये ग्रामपंचायतींनी त्यांना मंजूर केलेल्या विकास कामांचा दर्जा राखून मंजूर केलेली कामे नियमानुसार पूर्ण करावी . तसेच विविध प्रकल्पातून किंवा योजनेतून घेतलेल्या कामाची यादी न चुकता ग्रामपंचायत कार्यालयाच्या फलकावर लिहावी.शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१८८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन मुंबई दिनांक १३ जूलै २०२२ नुसार विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे **कामाचा विमा उतरविल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी अन्यथा कामाचे देयक आदा केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी**

महाराष्ट्र शासन,ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/ वित्त-९ दि.२५.०३.२०१५ अन्वये एजन्सी म्हणून काम करावयाचे आहे.तसेच ग्रामपंचायतीने स्वत मजूर लावून व साहित्य खरेदी करुन (डिपार्टमेंट पदधतीने) काम करणार असल्यास त्यासाठी जे साहित्य खरेदी करावयाचे आहेते मात्र रु.१.०० लक्षपेक्षा जास्त असल्यास प्रत्येक बाब E-Tendering दवारे निविदा मागवून करण्यात यावी.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.जिपर २०००/प्र.क्र.८३७/३५, मंत्रालय, मुंबई दि.०८ मे २००२ चे परिपत्रकानुसार मक्तेदाराने सोपविलेले कामाचा व ते पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कामाचे प्रथम देयक विमा उतरविल्याशिवाय आदा केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच गौणखनिज फी शासनास वेळच्यावेळी जमा करणे आवश्यक आहे तसेच काम सुरु करण्यापूर्वी कामाचे ठिकाणी माहितीफलक लावण्यात यावा. कामाचे देयक अनुदान उपलब्धते नुसार देण्यांत येईल.देयकातून शासकीय नियमानुसार वस्तु व सेवा कराची कपात करण्यात येईल. सदरच्या कामाचा दोष दायित्व निवारण कालावधी कामसंपलेल्या दिनांकापासुन ०३ वर्षाकरीता राहिल.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri.org या संकेतथळावर उपलब्ध असून त्यांचा सांकेतांक क्रमांक २०२३०५२१९११२५ असा आहे.

आपला विश्वासु,

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग रत्नागिरी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- उप अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग **संगमेश्वर** यांचकडे

२/- सदर कामासाठी वापरली जाणारी जागा शासनाच्या मालकीची असल्याची खात्री झाल्यानंतर जागेची कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन तसेच कामाचा विमा उतरवला असल्याची खात्री झाल्यानंतर आखणी करुन प्रत्यक्षात कामास सुरुवात करावी व ती कागदपत्रे प्रथम देयकासोबत जोडण्यात यावीत जागेची कागदपत्रे व विमा न जोडल्यास देयक पारित केले जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल. मक्तेदारांकडून मुदतीत काम पूर्ण करुन घ्यावे. प्रशासकीय मान्यतेमधील अटी व शर्तीचे पालन करावे. मंजूर अनुदापेक्षा जास्त खर्च करु नये त्यापेक्षा जास्त खर्च केल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

प्रत :- पी.ओ.-१ बांधकाम विभाग जि.प.**रत्नागिरी** यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

प्रत-सहाय्यक लेखाधिकारी बांधकाम विभाग रत्नागिरी जिल्हा परिषद रत्नागिरी यांना माहितीसाठी

प्रत-विमा संचालक, शासकीय विमा निधी, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन (म्हाडा) २६४, पहिला मजला, कलानगर समोर वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी. (दुरध्वनी क्रमांक ०२२/२६५९०६९०, २६५९०७४६)

प्रत- कार्यारंभ आदेश नस्तीस.